सायं.दैनिक

# विश्वनायक

● संपादक : बिलाल शेख ●

Email : vishvanayak94@gmail.com

Mo.86868 88898








बीड (महाराष्ट्र) | दैनिक | द्विभाषिक | वर्ष ०२ अंक - ३०० बुधवार दि.०५ नोव्हेंबर २०२५ | आरएनआय -एमएएचबीआयएल १०५४८ | किंमत २ रु | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily | BILINGUAL | Year 02 Issue - 300 WEDNESDAY, DT.05 NOVEMBER 2025 | TC : MAHBIL10548 | PRICE - 2 RUPEES | PAGES - 4


# सिंदफणा नदीत अवैध वाळू उपसा: पोलिसाच्या आशीर्वादाने माफियांचे धाडस

## पिंपळनेर परिसरातील गावांमध्ये रात्रीच्या वेळी वाळू माफिया यांचा धुडगूस

### रात्री अकरा ते पहाटे पाच पर्यंत चालतो वाळू उपसाचा खेळ !

### एका मोठ्या पोलीस अधिकाऱ्याचा आशीर्वाद असल्याची चर्चा

विश्वनायक न्यूज

बीड जवळ असलेल्या पिंपळनेर परिसरातील आडगाव, खुंडरस, कुक्कडगाव, भाटसांगवी या गावालगत असलेल्या सिंदफणा नदीपात्रातून अवैध वाळू उपसा मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. या अवैध वाळू उपशाला एका पोलीस अधिकाऱ्यांचा आशीर्वाद मिळत असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दररोज रात्री सुमारे ११ ते पहाटे ५ वाजेपर्यंत ट्रॅक्टर आणि छोटे टिपर यांच्या साहाय्याने वाळू उपसा सुरू असतो. या वेळेत नदीपात्रात ट्रॅक्टरांची अव्याहत वर्दळ असते. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पोलीस आणि वाळू माफिया यांच्यातील 'समजूत' झाल्यामुळे हा गैरकारभार खुलेआम सुरू आहे. चर्चेनुसार, प्रत्येक ट्रॅक्टर व छोट्या टिपरसाठी ३०,००० रुपये महिना दराने व्यवहार सुरू असल्याचे सांगितले जात आहे. या रकमेच्या बदल्यात पोलीस या अवैध उपसा आणि वाहतुकीला संरक्षण देऊन या गैरप्रकाराकडे दुर्लक्ष करीत असल्याचे आरोप नागरिकांकडून होत आहेत.स्थानिक प्रशासन आणि पोलीस विभाग यांच्याकडून अद्याप या प्रकरणी कोणतीही अधिकृत कारवाई झालेली नाही. मात्र, नागरिकांनी या अवैध उपशामुळे नदीपात्राचे नुकसान, भूजल पातळीतील घट आणि पर्यावरणीय असंतुलन याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. वाळूच्या या गोरख धंद्यावर प्रश्न उपस्थित होत आहे की, वाळू माफियांना खुलेपणाने संरक्षण देणारा तो पोलीस अधिकारी नेमका कोण ?आणि प्रशासन या गैरकारभाराकडे डोळेझाक का करत आहे? स्थानिक



नागरिकांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक तसेच खनिज विभागाने तातडीने चौकशी करून अवैध वाळू उपसा थांबवावा,



### पुराव्यासह करणार वाळू धंद्याचा पंचनामा !

पिंपळनेर परिसरातील सिंदफणा काठच्या गावांमधून जो वाळू उपसा होत आहे, त्या गैरप्रकाराचा पंचनामा पुराव्यासह आणि सर्व प्रकारच्या माहितीसह केला जाणार आहे. अवैध धंद्याला संरक्षण देणारा तो पोलिस अधिकारी कोण ? ट्रॅक्टर असो की टिप्पर त्यांचा हप्ता किती ? अवैध धंदे करणारे नेमके कोण आहेत? त्यांना कोणाकोणाचे संरक्षण मिळते ? कोणकोणत्या गावांमध्ये कशी लॉबी तयार झाली आहे ? यामध्ये केवळ पोलीस प्रशासनच नाही तर काही गुंड असलेल्या स्थानिकांचा आणि प्रशासनात असलेल्या अधिकाऱ्यांचा सोबतच या वाळू माफीयांना सहकार्य करून मलिदा खाणाऱ्या लोकप्रतिनिधींचा कसा पाठिंबा मिळतो याबाबतची सविस्तर माहिती उघड केली जाणार आहे.

### जिल्हा पातळीवरील अधिकारी अनभिज्ञ...

जिल्ह्यामध्ये चोरटी वाळू आणण्याचे प्रकार सर्रासपणे सुरू आहेत. याबाबत जिल्हाधिकारी असो की पोलीस अधीक्षक हे सतर्क आहेत मात्र, गोदावरी पात्रातून येणाऱ्या वाळूवर त्यांचे लक्ष केंद्रित आहे. अशा लोकांवर कारवाई करण्यास सुद्धा त्यांनी सुरुवात केली आहे मात्र सिंदफणा नदी मधून ज्या पद्धतीने वाळू उपसा होतो त्याबाबत त्यांना माहिती देण्यात आलेली नाही. नदीकाठाला लागून असलेल्या पिंपळनेर पोलीस ठाण्यांतर्गत मोठ्या प्रमाणामध्ये हा अवैध धंदा सुरू आहे. याला पोलिसातील काही अधिकारी जबाबदार आहेत. यामुळे हा प्रकार जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्यापर्यंत जात नाही. हा सगळा प्रकार त्यांच्या कानावर घालण्याची गरज आहे. जे पोलीस अधिकारी दोषी आहेत सोबतच प्रशासनातील कर्मचारी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींचा कसा समावेश आहे, याबाबतची सविस्तर अशी माहिती या वरिष्ठ अधिकाऱ्यांना द्यावी लागणार आहे.

# बीड जिल्ह्यात अनुसूचित जाती/जमातीच्या हक्कांसाठी ठोस निर्णय नितीन सोनवणे

## राज्य आयोग सदस्य गोरक्ष लोखंडे यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न

बीड (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य मा. गोरक्ष लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्हाधिकारी कार्यालयात ऑल इंडिया पँथर सेनेच्या प्रतिनिधींसमवेत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत अनुसूचित जाती/जमातीच्या हक्कांसाठी अनेक ठोस निर्णय घेण्यात आले. जिल्हाधिकारी मा. विवेक जॉन्सन आणि समाज कल्याण अधिकारी यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत पीडितांच्या तक्रारींवर तात्काळ कारवाईचे निर्देश देण्यात आले.बैठकीत प्रामुख्याने महात्मा फुले अंतर्गत छडऋऊ निधीच्या मागणीवर चर्चा झाली.



ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने बजेट मंजुरीसाठी जोरदार मागणी करण्यात आली. यावर मा. आयोग सदस्य गोरक्ष लोखंडे यांनी तात्काळ चौकशी करून सामाजिक न्याय विभाग, बीड यांना निधी मंजुरीचे लिखित निर्देश दिले. लवकरच बीड जिल्ह्यातील सर्व तक्रारदारांना हा निधी मिळणार असल्याचे आश्वासन देण्यात आले.डउ/डढ (अत्याचार प्रतिबंध) कायदा १९८९ अंतर्गत पुनर्वसन निधीच्या वितरणाबाबतही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. अत्याचार पीडितांना तात्काळ पुनर्वसन निधी मंजूर आणि वितरित करण्याची मागणी मान्य करून आयोगाने याबाबत लिखित निर्देश जारी केले.बीड जिल्ह्यातील 'इ ऋळपरश्र' प्रकरणामध्ये पोलीसांनी तक्रारदारांना मदत नाकारल्याबाबतच्या तक्रारीवरही चर्चा झाली. यासंदर्भात ऑल इंडिया पँथर सेनेने लिखित निवेदन सादर केले. तसेच, आष्टी पोलीस स्टेशन (कडा चौकी) येथील प्रकरणात अविनाश सोनवणे यांना संशयित म्हणून पोलीसांनी मारहाण केल्याच्या घटनेचा समावेश होता. दोषी पोलीस कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्याची मागणी करून सर्व पुराव्यासह लिखित निवेदन मा. आयोग सदस्य आणि जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आले.ऑल इंडिया पँथर सेनेचे प्रतिनिधी म्हणाले, अनुसूचित जाती/जमातीच्या न्याय आणि हक्कांसाठी आम्ही सातत्याने लढत राहू. हक्क मिळवून देण्याचा निर्धार आहे. बैठकीला ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष,नितीन सोनवणे, सुंदर वाघमारे,सुर्यकांत ठोकळ,नितीन लोखंडे,मधुकर लोखंडे व कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.




आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश (आण्णा) धस यांचे चिरंजीव तथा युवकांचे खंबीर नेतृत्व जयदत्त भैय्या धस यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देताना नगरआध्यक्ष राजु भैय्या जाधव , दैनिक विश्वनायक चे ता.पाटोदा प्रतिनिधी सय्यद फयाज

इन बॉक्स

# आपुलकीच्या नात्यातून साखर उद्योगातील दिग्गजांची सदिच्छा भेट!

(धाराशिव-अनिकेत हारे पाटील)

धाराशिव जिल्ह्यातील ववाशी तालुक्यातील पारगाव येथील भीमाशंकर शुगर मिल्स मध्ये नुकताच एक स्नेहबंधाचा आणि आदर-सन्मानाचा सोहळा पार पडला. निमित्त होते शिवसेना नेते अशोक जाधव यांच्या मुलीच्या विवाह सोहळ्याचे आणि या सोहळ्यासाठी आलेल्या एका खास पाहुण्याची. भैरवनाथ शुगर मिल्सचे व्हाईस चेअरमन केशव उर्फ विक्रम सावंत साहेब यांनी भीमाशंकर शुगर मिल्स, पारगाव येथे सदिच्छा भेट दिली. एका विवाह सोहळ्यानिमित्त पारगाव येथे आलेल्या सावंत साहेबांचे आगमन भीमाशंकर कारखान्यासाठी खास आणि आनंदाचे ठरले.

यावेळी, भीमाशंकर कारखान्याचे सर्वेसर्वा नितीन शेठजी लोढा साहेब यांनी अतिशय



आपुलकीने आणि आदराने केशव उर्फ विक्रम सावंत साहेब यांचा यथोचित सत्कार आणि सन्मान केला. साखर उद्योगातील दोन महत्त्वाच्या व्यक्तीमत्त्वांची ही भेट केवळ औपचारिक न राहता, त्यांनी एकमेकांबद्दल व्यक्त केलेला आदर आणि प्रेम संबंधांची ऊब दर्शवणारा होता.

लोढा साहेब आणि सावंत साहेब यांच्यातील ही सदिच्छा भेट, व्यावसायिक व्यस्ततेच्या पलीकडे जाऊन जपल्या जाणाऱ्या आपुलकीच्या नात्याची प्रचिती देणारी ठरली. यामुळे साखर उद्योगातील संबंधांना एक नवा आयाम मिळाला असून, मैत्री आणि आदराचा संदेश यानिमित्ताने सर्वत्र पोहोचला आहे.

# प्रभाग क्र. (१२) मधून प्रथमच मुस्लिम समाजांना उमेदवाराची संधी देण्यात आली आहे

## सय्यद रफिक सय्यद अली यांच्या उमेदवारीला पसंती

माजलगाव ( शेख अखिल ): माजलगाव

नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक (१२) मध्ये निवडणुकीची चुरस रंगू लागली असून, सय्यद रफिक अली सय्यद यांच्या ओपन पुरुष उमेदवारीकडे मतदारांचे लक्ष केंद्रीत झाले आहे. समाजात शांत स्वभाव, सर्वधर्म समभावाचा संदेश आणि विकासकामातील सातत्य यामुळे त्यांना स्थानिकांचा आपलीच उमेदवार असा विश्वास लाभला आहे. तसेच केलेली समाजसेवा, गरजूंना दिलेले सहकार्य आणि सर्व पक्षीय नेत्यांशी जुळवून घेतलेले सलोख्याचे संबंध, हे सय्यद रफिक अली सय्यद यांच्या प्रचारात मोठ भांडवल ठरणार आहेत.



गेल्या २५ वर्षापासून शहरात सय्यद रफिक हे लोक संपर्कात असून समाजसेवेचे काम करताना दिसतात. प्रभाग क्रमांक (१२)मध्ये तर सय्यद रफिक म्हणजे मदतीचा हात आणि त्यांचे आई अमतुल बाई म्हणजे घराघरात ओळखलेला विश्वास आहे. या प्रभागात त्यांनी ओपन पुरुषामध्ये उमेदवारी दाखल करण्याचा संकल्प केला

आहे. त्यांच्या निर्णयाचे वार्डात सर्वत्र स्वागत होत असून त्यांना प्रथम क्रमांकाची पसंती मिळत आहे. प्रभागातील महिला मतदारांकडून त्यांना विशेष पाठिंबा मिळत असून, महिलांच्या प्रश्नांवर ठोस भूमिका घेणारी उमेदवार अशी त्यांची ओळख तयार होत आहे. त्याचप्रमाणे यांनी वार्डात अनेक गरिबांची कामे केली आहेत. त्यांना पीटीआर मिळवून देणे, घरकुल मिळवून देणे, शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे. प्रभागातील विविध नागरी समस्येसाठी जनआंदोलने ही त्यांनी केली आहेत. गेल्या (२५) वर्षापासून त्यांनी या ठिकाणी समाजकार्यात स्वतःला झोकुन दिले आहे. गरिबांचा मशीहा म्हणून त्याची त्या ठिकाणी ओळख आहे. यापूर्वी त्यांनी केलेले वार्डातील कामे अनेकांच्या स्मरणात आहेत त्यामुळे होऊ घेतलेली प्रभाग क्रमांक (१२ )मधील सय्यद रफिक सय्यद अली ओपन ची निवडणूक जनतेने हाती घेतल्याची स्थिती दिसून आली आहे

सायं.दैनिक
# विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख •
Mo-9422404740
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )



# सौ. वृषालीताई नितिन जायभाये नगराध्यक्ष पदाच्या निश्चित उमेदवार

## एस.सी. महिलांसाठी नगराध्यक्ष पद आरक्षित झाल्यामुळे प्रस्थापित घराणे 'शहां' च्या राजकारणाला पूर्णविराम

मरहूम अथहर बाबर साहेब यांच्या स्वप्नातील 'बीड नगरी' साकारणार

बीड ।प्रतिनिधी

सर्व डाव्या पक्षांना, पुरोगामी विचारांच्या तसेच शाहू,फुले,आंबेडकर आणि अण्णाभाऊंच्या विचारांच्या चळवळीतील सर्वांना सोबत घेऊन नगर अध्यक्षपदासह पूर्ण नगरपालिकेची निवडणूक बीड शहर बचाव मंच जनाधारावर व जनतेच्या आशीर्वादांवर लढवणार अशी आज घोषणा करण्यात येत आहे. मरहूम आदरणीय अतहर बाबर साहेबांच्या जाण्यानंतर त्यांच्यासोबतच नगरपालिकेत निस्वार्थ, भ्रष्टाचारमुक्त आणि पारदर्शक कारभार संपुष्टात आला. पुन्हा म्हणून आजतागायत निस्वार्थ, जनतेच्या सेवा उद्देशाने, भ्रष्टाचार मुक्त, पारदर्शक कारभार बीड नगरपालिकेमध्ये कधीच झाला नाही. कायम भ्रष्ट व्यवस्था निर्माण करून प्रदीर्घ असा तीन पिढ्यांचा काळ एकाच घराण्याने तिथे सत्ता भोगली. कायम मनमानी पद्धतीने भ्रष्टाचारी व्यवस्था निर्माण करत नगरपालिकेला तसेच शासनाच्या येणाऱ्या सर्व निधींना लुटण्याचा कार्यक्रम चालवला गेला. अलीकडच्या काळामध्ये सुद्धा रस्त्याची बोगस बिले उचलणे, एकाच रस्त्याची किंवा कामाची तीन-तीन वेळेस बिले उचलणे, अटल अमृत जल योजना व भुयारी गटार योजनां सारख्या अनेक योजना ज्यासाठी शासनाचा शेकडो कोटी रुपये निधी उपलब्ध झाला होता अशा सर्व योजना प्रस्थापित घराण्यांनी गिळंकृत केल्या. विकासाच्या नावाखाली सातत्याने बीड शहराला भकास करण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला. बीड शहरांमध्ये अनेक समस्या आहेत. शहराला पिण्याच्या शुद्ध पाण्याच्या पुरवठ्यासह घनकचऱ्याचा व नियमित सफाईच्या कामांचाही प्रश्न फार मोठ्या संकट स्वरूपामध्ये सातत्याने भेडसावत आहे. मुस्लिम बहुल वार्डांमध्ये रस्ते, नाल्या, पिण्याचे पाणी, सफाई व सर्वच मूलभूत सुविधांच्या विकासाच्या कामांच्या अभावी मानवी' जीवन स्तर हेतू पुरस्सर पद्धतीने प्रचंड ढासळवण्यात आला आहे. आपले मुस्लिम बांधव, महिला-भगिनी ज्येष्ठ थोर आणि लहान मुले प्रचंड हाल अपेष्टा सहन करत आहेत. ज्येष्ठ थोर व लहान मुले यांच्यात सातत्याने आरोग्याचे प्रश्न निर्माण झालेले आपल्याला



दिसून येतात. एकंदर आपल्या सर्वांच्या पुढच्या पिढीचे भवितव्य या सर्व घराणे 'शहां' नी धोक्यात आणले आहे. या सर्व भ्रष्ट व्यवस्थेला आळा घालण्याची आता वेळ आलेली आहे. जनतेने जागृत होणे फार गरजेचे आहे. आपल्या पुढच्या पिढीचे भविष्य-भवितव्य आपल्याच हातात आहे. सर्वांनी आपल्या पुढच्या पिढीच्या चांगल्या भवितव्याचा विचार करत चांगले लोकप्रतिनिधी व चांगली नगराध्यक्षा निवडून देण्याची गरज आहे. आपल्या सर्वांच्या व आपल्या पुढच्या पिढीच्या भवितव्याचा विचार करत बीड शहर बचाव मंच सर्व पुरेगामी विचारांच्या चळवळीतील लोकांना सोबत घेऊन योग्य उमेदवाराचा पर्याय आपल्याला देत आहे. तरी सर्व चळवळीतील लोकांच्या सहकार्यावर व जनाधारावर नगर अध्यक्षपदासाठी उभ्या असलेल्या उमेदवार 'सौ. वृषालीताई नितिन जायभाये' यांना आपण सर्वांनी प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# कुटेवाडी एक वर्षापासुन पाण्यापासून वंचित अमरण उपोषण करण्याचा नागरिकांचा इशारा




पाटोदा (प्रतिनिधी)

पारनेर ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत कुटेवाडी गावाला पाणी पुरवठ्याची विहिर असुन सुद्धा विहिरीला दररोज कितीतरी पाणी येत आहे. दररोज पाणी सोडले तरी भरपुर प्रमाणात पुरेल इतके पाणी असुन सदरील सदरील गावाला गेल्या एक वर्षापासुन पाणी पुरवठा होत नाही. कधीतरी दोन महिने किंवा तिन महिण्यातुन एकदा थोड्या प्रमाणात पाणी सोडले जाते. तसेच गावाला जलजिवन योजने अंतर्गत विहिर मंजुर असुन या विहिरीला निधी सुध्दा वापरलेला आहे. खरं बघितले तर या विहिरीचे काम केलेले नाही अनेक वेळा गावकऱ्यांनी तक्रार करुन सुध्दा ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक यांनी उडवाउडवीचे उत्तरे देऊन मुद्दामहून टाळाटाळ करत असुन वेळ काढु पणा करत आहेत. तसेच गावातील लोक साखर कारखान्यावर ऊसतोडणी गेलेले असुन सध्या गावामध्ये फक्त वयोवृध्दच लोक आहेत व शाळेतील लहान मुले आहेत. त्यांची पाण्या अभावी गैरसोय होत असुन त्यांना गावाबाहेरुन विहिरीवरुन एक ते दिड किलोमीटर अंतरावरुन पाणी आणावे लागते. जर वयोवृध्द व लहान मुलांना यातुन काही इजा झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सरपंच, ग्रामसेवक व आपले कार्यालय राहिल याची नोंद असे निवेदन मा. तहसीलदार डि.बी.निलावड यांना देण्यात आले.सरपंच / ग्रामसेवक यांनी तात्काळ पाणी सोडण्याची उपाययोजना करावी नसता सर्व ग्रामस्थ कुटेवाडी या वाडीतील नागरिक दि.२० नोव्हेंबर २०२५ रोजी पंचायत समिती समोर आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. या निवेदनावर सोपान लहानु जाधवर ,बाळु नामदेव सातपुते, ज्ञानेश्वर बागर, सतिश बांगर, मारुती गर्जे, अर्जुन यादव, जानु नेहरकर,गिन्यानदेव जाधवर, बाबासाहेब ओटे, रामेश्वर बांगर,

# बाळासाहेब सोनटक्के यांनाच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ने उमेदवारी द्यावी--युवकांची मागणी

किल्ले धारूर (प्रतिनिधी)

तेलगाव पंचायत समिती गणातील तरुण व सतत सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे बाळासाहेब सोनटक्के यांनाच तेलगाव पंचायत समिती गणातून उमेदवारी द्यावी अशी मागणी मतदार संघातील अनेक युवकांनी केली आहे. बाळासाहेब सोनटक्के हे तेलगाव परिसरामध्ये सामाजिक कार्यात सतत सक्रिय असतात. गोरगरीब जनतेचे अनेक प्रश्न सोडवित असताना त्यांनी कधीच जात धर्म बघितला नाही शेतकऱ्यांचे प्रश्न असतील युवकांचे प्रश्न असतील अब्बाल वृद्धांचे प्रश्न असतील ते सोडवण्यासाठी बाळासाहेब सोनटक्के हे अहोरात्र लोकांच्या सेवेसाठी पुढे असतात. लोकप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांचे खंदे समर्थक व व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ पने आजपर्यंत काम केलेले आहे जयसिंग भैय्या सोळंके व आमदार प्रकाश दादा सोळंके यांना बाळासाहेब सोनटक्के यांनी वेळोवेळी अनेक निवडणुकीमध्ये मदत केलेली आहे तर बाळासाहेब सोनटक्के



यांच्या कामाची हातोटी आमदार प्रकाश दादा सोळुंके यांना ही माहित आहे त्यामुळे अशा प्रामाणिक व एकनिष्ठ कार्यकर्त्याला पंचायत समितीची उमेदवारी देऊन मतदार संघातील जनतेची सेवा करण्याची संधी द्यावी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढीसाठी बाळासाहेब सोनटक्के यांचा पक्षाला फायदा होईल याची दक्षता घेऊन बाळासाहेब सोनटक्के यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी तेलगाव पंचायत समिती गणातील अनेक युवकांनी केलेली आहे.

## लुखेगाव येथील सिंदफणा नदीकाठाचे खरडून गेलेले पिक व जमिनीचे पंचनामे न झाल्याने

# जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा गावकऱ्यांनी दिले आहे

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातअसलेल्या लुखेगाव येथे सिंधफणा नदीकाठाचे खरडून गेलेले शेतकऱ्यांचे पिक व जमीन पंचनामे न झाल्याने शेतकऱ्यांनी जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा दिला व शेतकरी संबंधित अधिकारी कर्मचारी ने काही शेतकऱ्यांचे संघमाताने चिरीमिरी घेऊन खोटे पंचनामे करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यावर सखोल चौकशी करून योग्य ते कठोर कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात यावी अशी मागणी लुखेगाव येथील शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे व वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांचे सात दिवसाच्या आत पंचनामे करून त्यांना न्याय देण्यात यावे नसता लुखेगाव चे शेतकरी लुखेगाव येथे. १२/११/२०२५ रोजी.वार बुधवारी या दिवशी,ठीक :११वा.सिंदफना लोकशाही मार्गांने लुखेगाव येथे नदीमध्ये जलसमाधी आंदोलन करणार आहे याची गंभीर्यपूर्वक नोंद घेण्यात यावी त्यात काही अनुसूचित प्रकार घडल्यास संपूर्ण जबाबदारी संबंधित तलाठी, कृषीसहायक, व ग्रामसेवक, यांची वरती राहील याची पण आपण दक्षता घ्यावी अशी मागणी लुखेगाव येथील शेतकरी वर्गातून होत आहे व वंचित शेतकऱ्यांना फेर पंचनामे करून न्याय देण्यात यावे असे शेतकरी.. राशेद खान, नेमत खा



पठाण ,शेख मिय इमाम, समद खा सरदार खा पठाण, बेग नुर,आमिर खान पठाण,कबीर खा रशीद खान, मुखतार खा सत्तारखा पठाण,अकबर खा राशेद,मुजमील सरदार खा पठाण,नसीमाबी, अखिल खा पठाण,राजेभाऊ नारायण मुसळे,रुकसनाबी,सरदार खा पठाण,परवेज नय्युम पठाण, शोएब नय्युम पठाण,रघुनाथ किसन पवार,बापूराव रघुनाथ पवार,रेश्मा बी अनवरखा पठाण,अखिल खान रसूल खान पठाण,सोजरा बाई मेंडके,हे सर्व शेतकऱ्यांना सरकार माय बापने लवकरात लवकर न्याय देण्यात यावी

# माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या प्रयत्नां मुळे अतिक्रमण धारकांना मिळणार हक्का चे पी टी आर व घरकुल

प्रतिनिधी । गेवराई

गेवराई शहरातील साधारण ७५ वर्षांपासून वसलेली वसाहत कोरबू गल्ली या नावाने आहे या भागातील राहिवासींना अतिक्रमण मुळे नगर परिषद च्या सुविधा उपलब्ध करून देण्यासात येत नव्होती गेल्या १५ ते २० वर्षांपासून माजी सत्ताधारी यांनी या भागाकडे दुर्लक्ष केले होते या भागातील उपनगर अध्यक्ष शेख खाजा मामु यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित व लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांच्या कडे सतत मागणी केली या मागणीचे फलित या भागातील अतिक्रमण धारकांना पी टी आर च्या स्वरूपात मिळाले आहे या भागातील रहिवासी आणि माजी उपनगरधक्ष शेख खाजा मामु यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित व लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित आभार मानले आहे.

सर्वांसाठी घरे २०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रात असलेल्या शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमाकूल



करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत आणि या शासन निर्णयामध्ये प्रधानमंत्री आवास योजनांतर्गत लाभ मिळण्यास प्रात्र ठरत असलेल्या व महसूल विभागाच्या अखत्यारीत सर्व प्रकारच्या शासकीय जमीनवर निवासी प्रयोजनासाठी अतिक्रमण केलेल्या अतिक्रमण धारकांची अतिक्रमणे नियमाकूल करण्याची कार्यवाही करण्यासाठी ब व क वर्ग नगरपरिषदा व नगरपंचायत हददीतील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करण्यासाठी मा उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पूढील प्रमाणे समिती गठीत करण्यात आलेली आहे.

याअर्थी गेवराई नगरपरिषदेने संदर्भ क्र १७ व १९नुसार अर्जाची छाननी करणे करीता कार्यालयीन पथके व समिती स्थापन करुन अर्जाची छाननी केली आहे सव्हे क्र १, ६०, १२१, १२५. १२६, २७५, २७८,२८१,५८३,५८४ व गावठाण अतिक्रमीत भूखंडावरील अतिक्रमण धारकांचा ड्रोन व्दारे सव्हें केला असता अंदाजित एकुण २२२० अतिक्रमीत भूखंड आढळून आले आहेत. त्यांची छाननी करते वेळी अर्जदार यांचे नावे स्वतःची जमीन नसावी, अर्जदार यांनी स्वताःच्या नावे असलेले दिनांक ०१/०१/२०११ पूर्वीचे पुरावे रेशन कॉर्ड, विदयुत पुरवठा बिल, मतदान कार्ड, करभरणा पावती इत्यादी अर्जासोबत घ्यावे तसेच अर्जदार यांनी अतिक्रमीत केलेले भूखंड हे कच्चे बांधकाम प्रकारचे असून निवासी प्रयोजनसाठीचे असावे. अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे केवळ एकच भूखंड नियामानुकूल करण्यात यावा. सर्व्हे क्र १, ६०, १२१, १२५, १२६, २७५, २७८, २८१,५८३, ५८४ व गावठाण अतिक्रमीत भूखंडावरील अतिक्रमण धारकांचा ड्रोन व्दारे सव्र्व्हे केला असता अंदाजित एकुण २२२० अतिक्रमीत भूखंड आढळून आले आहेत.

# गोखले बी.एड. कॉलेज : उत्कृष्ट शिक्षक घडविणारे संस्थान - डॉ. भारत कऱ्हाड

प्रतिनिधी । मुंबई

गोखले बी.एड. कॉलेज हे उत्कृष्ट शिक्षक घडविणारे आदर्श शैक्षणिक संस्थान आहे, असे मत दापोली येथील वराडकर बेलोसे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांनी व्यक्त केले.त्यांनी मुंबई येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या बी.एड. महाविद्यालयाला भेट दिली, त्याप्रसंगी ते बोलत होते.

या वेळी प्राचार्य डॉ. सुरेंद्र चंद्रकांत हेरकळ यांनी पुष्पगुच्छ यांनी डॉ. भारत कऱ्हाड यांचे स्वागत केले. याप्रसंगी ग्रंथपाल डॉ. शिल्पा वाघचौर, मुख्य लिपिक श्री. काशिनाथ चौरे, तसेच शिक्षक व कर्मचारी कु. सिध्दी अंबादासकर, सौ. मयुरी पालकर, श्री. हेमंत येळवे, श्री. सदाशिव भोसले उपस्थित होते.

डॉ. कऱ्हाड यांनी या प्रसंगी शिक्षक शिक्षणातील गुणवत्ता, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक कौशल्ये आणि



मूल्याधिष्ठित शिक्षण यांवर सविस्तर विचार मांडला. त्यांनी सांगितले की, उत्तम शिक्षक तयार करणे म्हणजे समाजाचा पाया मजबूत करणे होय. गोखले बी.एड. कॉलेज ही परंपरा अभिमानाने जपत आहेबीएड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेंद्र चंद्रकांत हेरकळ यांनी यावेळ महाविद्यालयाचे विद्यार्थी संख्या संशोधन आणि अध्यापन विषय विविध बाबतीत सविस्तर माहिती दिली.विशेषतः पीएचडी करणारे विद्यार्थ्यांचे संख्या खूप चांगली असल्यामुळे डॉ. कऱ्हाड यांनी महाविद्यालयाचे कौतुक केले.

# सौ.भाग्यश्री सौरभ काकडे-पाटील या सी.ए. उत्तीर्ण

प्रतिनिधी । अहिल्यानगर

चार्टर्ड अकाउंटंट कोर्सच्या अंतिम परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या अर्थ विभागाच्या कार्यवाह सौ.भाग्यश्री सौरभ काकडे-पाटील या सी.ए. उत्तीर्ण झाल्या आहेत. त्यांनी मिळविलेल्या या घवघवीत यशाबद्दल आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहासह परिसरातून त्यांचे अभिनंदन व कौतुक केले जात आहे. गेल्या तीन ते चार वर्षांपासून सौ.काकडे/पाटील या आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या अर्थ विभागाचा कार्यभाग पाहत आहेत. यासह आबासाहेब काकडे कॉलेज ऑफ फार्मसी बोधेगाव व एन.एन.सथ्था कॉलेज ऑफ फार्मसी, अहिल्यानगर या महाविद्यालयाच्या समन्वयक म्हणूनही त्या काम पाहत आहेत. आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या त्या माजी विद्यार्थिनी आहेत. आजोबा कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या वकिलीचा वारसा घेत त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांनी हे यश संपादन केले आहे.

द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया तर्फे प्रत्येक वर्षी मे आणि नोव्हेंबर महिन्यामध्ये वर्षातून दोन वेळा ही परीक्षा घेतली जाते. चार्टर्ड अकाउंटंट कोर्स हा विश्वस्तरीय मान्यता असलेला कोर्स असल्याने त्याची परीक्षा ही अवघड समजली जाते. सौ.काकडे/पाटील यांनी सी.ए. होण्याचे स्वप्न उराशी बाळगून मेहनत केली आहे. जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी हे यश मिळविले आहे



# महाराष्ट्र प्रदेश विद्यार्थी काँग्रेस च्या प्रदेश सचिव पदी ॲड. परमेश्वर अंडील यांची निवड

बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सर्वसामान्य तरुणाचा काँग्रेस पक्षाने न्याय दिला...

प्रतिनिधी । बीड

बीड चे भूमिपुत्र परमेश्वर अंडील यांची महाराष्ट्र प्रदेश विद्यार्थी काँग्रेसच्या छडणख राज्य सचिव पदी निवड करण्यात आली. अंडील यांनी सिद्धार्थ विधी महाविद्यालय, मुंबई येथून ङ्ङ्ङ पदवी प्राप्त केली व राजकारणात आपले महत्वाचे स्थान निर्माण केले. त्याच्या निवडीमुळे सर्वच क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

परमेश्वर अंडील हे गेल्या अनेक वर्षापासून काँग्रेस पक्षांमध्ये प्रामाणिक कार्यकर्ता म्हणून काम पाहत आहेत. त्यांच्या कामावर खुश होत पक्षाने त्यांना महाराष्ट्र प्रदेश विद्यार्थी काँग्रेसच्या छडणख सचिव म्हणून नियुक्त केले. येणाऱ्या काळात विध्यार्थ्यांच्या प्रश्नावर सरकारशी झगडत राहू असे त्यांनी पत्रकात म्हटले आहे. या निवडी बद्दल ॲड.परमेश्वर अंडील याचे महाराष्ट्रातून भरभरून कौतुक होत आहे.

